**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : मग्रारो-२०१७/प्र.क्र.५७-अ/रोहयो-१०अ,
नियोजन विभाग (रोहयो)
नविन प्रशासकीय भवन, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० जुलै,२०१८

प्रति,

१.सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक,
२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक,

**विषय :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्राम रोजगार सेवकांच्या तक्रारीसंदर्भात अनुसरावयाच्या कार्यपध्दती.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र.मग्रारो २०११/प्र.क्र.४०/रोहयो-१०अ,दि.०२ मे,२०११.
२) शासन निर्णय क्र.मग्रारो २०१३/प्र.क्र.२१७/रोहयो-३,दि.२२ जानेवारी,२०१४.
३) शासन निर्णय क्र.मग्रारो २०१६/प्र.क्र.१७३/रोहयो-१०अ,दि.०४ सप्टेंबर,२०१७.

महोदय,

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्राम रोजगार सेवकांच्या तक्रारीसंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक २२ जानेवारी, २०१४ अन्वये निर्गमित करण्यात आली आहे. तसेच ग्राम रोजगार सेवकांना त्यांच्या पदावरुन काढून टाकण्याबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत स्पष्ट निर्देश सदर शासन निर्णयामध्ये नमूद केले आहेत. मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या निर्देशांचे ग्रामसभेद्वारे गांभीर्याने पालन केले जात नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत असलेले ग्राम रोजगार सेवक यांच्या कामासंदर्भात या योजनेचे लाभार्थी, मजूर, ग्रामपंचायतीचे ग्राम सेवक, सरपंच व पदाधिकारी, जिल्हा परिषद/पंचायत समितीचे पदाधिकारी, अशासकीय संस्था, सामान्य नागरीक व या योजनेशी संबंधित इतर घटक यांच्याकडून तक्रार अर्ज प्राप्त होतात. अशी तक्रार प्राप्त झाल्यास अथवा त्यांना गैरवर्तणुकीमुळे पदावरुन दूर करण्याचा निर्णय घेण्यात आल्यास शासन निर्णय दि. २२ जानेवारी, २०१४ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीकडून ग्राम रोजगार सेवकास पदावरुन दूर करण्याची कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

यास्तव, ग्राम रोजगार सेवकांच्या कामासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास अथवा त्यांना गैरवर्तणुकीमुळे दि.२२/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करुन पदावरुन दूर करण्याचा निर्णय घेण्यात आल्यास सदर ग्रामपंचायतीने ग्राम रोजगार सेवकास पंधरा दिवसाच्या आत पदावरुन काढून टाकण्याची कारवाई करावी. पंधरा दिवसाच्या आत ग्रामपंचायतीने ग्राम रोजगार सेवकास काढून न टाकल्यास गट विकास अधिकारी (पंचायत) यांनी निलंबाचे आदेश निर्गमित करावेत.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रियस्तरावर सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात तसेच याबाबत तात्काळ कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करावा, ही विनंती.

आपला,

(बा. कि. रासकर)
उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग